# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष–२ ■ अंक–४९ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ३ जुलै २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669



# दिव्यात अनेक बैठ्या चाळीत पाणी साचले





## सामाजिक कार्यकर्त्यांनी जेसीबी लावून नाले मोकळे करुन दिले

## मग दिव्यासाठी आलेल्या नालेसफाईच्या निधीचे काय झाले?



### दिव्यातील नालेसफाईची आयुक्तांनी चौकशी करावी, दिव्यातील नागरिकांची मागणी

**दिवा:–** पहिल्याच पावसात दिव्यातील सकल भागातील घरात पाणी घुसल्याने दिव्यातील नालेसफाईची ठाणे महापालिका आयुक्तांनी चौकशी करावी अशी मागणी आता नागरिकांमधून होत आहे.

दिवा शहरातील प्रमुख नाले हे वेळीच साफ न केल्याने व नाळ्यातील वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह मोकळा न केल्याने शहरातील अनेक बैठ्या घरांमध्ये पावसाचे पाणी साचले. पाऊस पडल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते राजकीय नेत्यांनी खाजगी जेसीबी लावून अनेक ठिकाणी नाले साफ करून दिले .मग प्रशासनाने नेमकं काय काम केले? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.नालेसफाईसाठीचा निधी नेमका कुठे गेला? याची चौकशी आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी नोंदवले आहे. नालेसफाई न झाल्याने अनेक नागरिकांना त्रास सहन करावा लागला. बैठ्या चाळीतील घरांमध्ये पाणी घुसल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. दिवा शहरात आजही अनेक नागरिक हे बैठ्या चाळीत राहतात.नाल्यांची सफाई न झाल्याने,त्याच बरोबर काही ठिकाणी नाल्यातील गाळ काढून तो त्याच ठिकाणी ठेवल्याने पुन्हा नाले भरले. नालेसफाईच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबरोबर दिवा शहरातील नालेसफाईची चौकशी व्हावी अशी मागणी आता दिवा शहरातील नागरिक करत आहेत.


नियमित प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र...

लवकरच 3 ऱ्या वर्षात पदार्पण करत आहे...

दिवा न्यूज

लवकरच नव्या स्वरूपात...

# तहसीलदार कार्यालयातून बंद झालेले दाखले देणे तात्काळ सुरू करा

## युवासेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**ठाणे:** नुकत्याच इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक लागणारे दाखले तहसीलदार सेतू कार्यालयातून देणे बंद झाल्याने विद्यार्थ्यांना व नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याची दखल घेऊन ठाणे जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवा व युवती सेनेच्या वतीने शुक्रवारी ठाणे तहसीलदार युवराज बांगर व जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना पत्र तहसीलदार निलीमा सुर्यवंशी यांच्यामार्फत देवून महा ऑनलाईनची ठप्प झालेली सेवा तात्काळ सुरू करावी तसेच महाविद्यालयीन प्रवेशासाठी मुदतवाढ मिळविण्यासाठी शासनाचे परिपत्रक तात्काळ काढून घ्यावे अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उप जिल्हा अधिकारी ठाणे अर्जुनसिंह डाभी, ठाणे युवासेना अधिकारी किरण जाधव, ओवळा माजिवाडा विभाग अधिकारी नटेश पाटील, कोपरी पाचपाखाडी विभाग अधिकारी राजेश वायाळ, ठाणे शहर विधानसभा चिटणीस रितेश देशमुख, ठाणे शहर विधानसभा उप समन्वयक सौरभ निकम, विभाग अधिकारी राज वर्मा, सर चिटणीस जयदीप जाधव, सह समन्वयक अखिलेश पाल, जतीन पवार, विधानसभा अधिकारी ओवळा माजिवडा पूजा भोसले, जिल्हा समन्वयक युवतीसेना आरती खळे व इतर युवासेना पदाधिकारी उपस्थित होते.



# सिनेअभिनेत्री नूतन यांच्या बंगल्याचा काही भाग पडला

***ठाणे :*** *सिनेअभिनेत्री नूतन यांचा मुंब्रा-रेतीबंदर सर्कल जवळील पारसिक हिल येथील बंगल्याचा काही भाग पडल्याची घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास समोर आली. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नसून या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेतली. तसेच संबंधित विभागाने याबाबतची नोंद घेतली. तसेच तो बंगला पडीक असून त्याचा सज्जाचा मोठ्या प्रमाणात भाग कोसळला असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.*

# ठाण्यात कोसळले सार्वजनिक शौचालयाच्या छताचे प्लास्टर

**गोकुळनगर येथील घटना**



**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेच्या तळ अधिक दोन मजली सार्वजनिक शौचालयाच्या छताचे प्लास्टर कोसळल्याची घटना रविवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास उथळसर,आझाद नगर, गोकुळ नगर, या ठिकाणी घडली.तर, घटनास्थळी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आपत्ती व्यवस्थापन कक्षा मार्फत धोकापट्टी बांधण्यात आली आहे. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही.

या घटनेची माहिती स्थानिक माजी नगरसेविका नंदा कृष्णा पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षाला दिल्यावर घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, उथळसर प्रभाग समिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. तातडीने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आपत्ती व्यवस्थापन कक्षा मार्फत त्या ठिकाणी धोकापट्टी बांधण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# मुंब्यात इमारतीचा स्लॅबच पडला



**ठाणे:** पावसाचा जोर बुधवारी सकाळपासून पाहण्यास मिळत असताना, मुंब्रा, रेतीबंदर या ठिकाणी असलेल्या पिंट्या दादा बंगल्यासमोरील तळ अधिक तीन मजली रमाबाई इमारतीच्या तिसऱ्या मजल्यारील रूम नंबर २५ च्या हॉलमधील स्लॅब रूमच्या आतमध्ये पडल्याची घटना दुपारी साडेतीन ते पावणे चार वाजण्याच्या सुमारास घडली. ही इमारत धोकादायक इमारतीच्या यादीतील असून ती इमारत या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात रिकामी केली होती. त्यामुळे ही दुर्घटना घडली त्यावेळी घरात किंवा त्या इमारतीमध्ये कोणीबनसल्याने मोठे अनर्थ टळले.

स्लॅब कोसळलेली इमारत ही ३५ वर्षे जुनी असून त्यामध्ये एकूण २३ रूम आणि तळ मजल्यावर तीन गाळे आहेत. तसेच ती इमारत धोकादायक इमारतीच्या यादी आहे. त्यामुळे या महिन्याच्या सुरुवातीला ती इमारत रिकामी केली होती. त्या इमारतीत कोणी राहत नव्हते. स्लॅब पडल्याची माहिती मिळताच घटनास्थळी मुंब्रा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेतली होती. पुढील कार्यवाहीसाठी सहाय्यक आयुक्तांनी संबंधित विभागाला माहिती दिली आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# नाल्यामध्ये पडलेला मुलगा बेपत्ता

**ठाणे:** बुधवारी दिवसभर जोरदार झालेल्या पावसाने नाल्यातून ही पाणी जोराने वाहत होते. त्यातच दिवा, खर्डी गाव येथील एम एस कंपाऊंड या ठिकाणी नाल्यामध्ये दिव्यात राहणारा वसीम सय्यद नामक हा मुलगा पडल्यानंतर त्यामध्ये तो वाहून गेला. तो अद्यापही सापडलेला नाही. वसीम हा १६ वर्षीय असून तो बुधवारी रात्री पावणे नऊ ते नऊ वाजण्याच्या नाल्यामध्ये पडला. तसेच त्या नाल्याच्या पाण्यात तो वाहून गेला आहे. याघटनेची माहिती मिळताच घटनास्थळी मुंब्रा पोलीस तसेच अग्निशमन दलाचे जवान धाव घेतली. तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी दीड तास शोधकार्य केले असता वाहून गेलेला मुलगा सापडला नाही तसेच रात्रीचा अंधार असल्याने शोधकार्य करणे शक्य नसल्याने बंद केले होते. तसेच गुरुवारी सकाळी ही शोधकार्य हाती घेतल्यानंतर ही तो मिळून आला नसल्याने पुन्हा शोधकार्य तुर्तास बंद करण्यात आले होते. तो कदाचित तोल जावुन पडला असेल, असा पोलीसांचा अंदाज आहे, कारण त्याबाबत सांगायला कोणी तयार नाही. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# गांधीनगरच्या पाईपलाईनवरील पूल वाहतुकीस खुले

## वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईल

ठाणे : वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत नव्याने तयार करण्यात पोखरण रोड नं. २ वरील बीएमसी पाईपलाईनवरील दोन्ही पूल वाहतुकीस खुले करण्यात आले आहेत. यामुळे या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार असल्याचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले.

पोखरण रोड न. २ चे रुंदीकरण करण्यात आले आहे. यामध्ये ४० मीटर रुंदीचा रस्ता तयार करण्यात आला आहे, परंतु बीएमसी पाईपलाईनवरील पुलाचे काम येथील अतिक्रमण व अन्य कारणास्तव मार्गी लागले नव्हते. या ठिकाणी सर्व अडथळे दूर करुन दोन्ही बाजूच्या पुलाचे काम नुकतेच पुर्ण झाले असून सदर पूल वाहतुकीस खुले करण्यात आले आहे. सदर ठिकाणी रेमंड कंपनीच्या बाजूस ८९.६० मीटर तर सुभाष नगरच्या बाजूस १२०.६० मीटर पुलाचे काम करण्यात आले आहे. दोन्ही बाजूचे पुल वाहतुकीस खुले केल्यामुळे उपवन, वसंतविहार, ग्लॅडी अल्वारिस रोड, पवारनगर, महाराष्ट्र नगर, खेवरा सर्कल, हॅप्पी व्हॅली, सिंध्दाचल, कोकणीपाडा आदी विभागाकडे होणारी वाहतूक सुरळीत होणार आहे. तसेच अरुंद पुलामुळे होणारी वाहतूक कोंडी देखील मार्गी लागली आहे.

या रस्त्याच्या नजीक असलेल्या श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया स्कूलची देखील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शाळकरी मुले, नोकरदार वर्ग यांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळाला आहे.

प्रलंबित रस्ते व पुलाचे प्रकल्प मार्गी लावून तसेच नवीन मार्ग प्रस्तावित करुन शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्येवर मार्ग काढण्यासाठी महानगरपालिका व इतर शासकीय यंत्रणा प्रयत्नशील आहेत. नुकत्याच सुरू झालेल्या कळवा पूल, नवीन कोपरी पूल या पुलांमुळे ठाणे शहरातील दोन महत्वाचे प्रवेश मार्ग वाहतूक कोंडीमुक्त झाले, त्याचपध्दतीने अंतर्गत वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पोखरण रोड क्र. २ वरील गांधीनगर पूल ही महत्वाची लिंक आहे, ज्याचे सहा वर्षापासून प्रलंबित असलेले काम पूर्ण करुन सदर पूल नागरिकांना वाहतुकीसाठी खुला करुन देण्यात आला आहे, भविष्यामध्येही प्रलंबित प्रकल्प मार्गी लावून वाहतूक कोंडीतून मार्ग निघेल यासाठी प्रयत्न केला जाईल असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले.



# महाऑनलाईन पोर्टल दहा दिवसांपासून बंद

**ठाणे:** दहावी आणि १२ वीचे निकाल लागले असून महाविद्यालय प्रवेशाची प्रक्रियाही सुरु झाली आहे. मात्र, या प्रवेशासाठी आवश्यक असणारे दाखले वाटप करणारी यंत्रणा कुचकामी ठरली आहे. गेल्या दहा दिवसांपासून महाऑनलाईन पोर्टल हे संकेतस्थळ बंद असल्याने दाखले वाटप प्रक्रिया ठप्प झाली आहे.

मात्र,आपले सरकार- गतीमान सरकार असा दावा करणाऱ्या या शिंदे-फडणवीस सरकारला त्याच्याशी काहीही देणेघेणे नसून ते विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळत आहेत, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे ट्वीट द्वारे यांनी केला आहे.

सध्या शैक्षणिक सत्र सुरु असून विविध ठिकाणी दाखले वाटप शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे. परंतु महाऑनलाईन पोर्टल दिवसा पूर्णत: बंद असल्याने दाखल्यांची आवक वाढत आहे. परंतु, महाऑनलाईन पोर्टल बंद असल्याने दाखले मंजुरीकरीता पुढे पाठवता येत नाहीत. संकेतस्थळ अपडेट करण्याच्या नावाखाली हे संकेतस्थळच बंद असल्याचा फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. विशेष म्हणजे संकेतस्थळ अपडेट करण्याचे काम दिवसा केले जात असल्याने रात्री काही काळासाठी हे संकेतस्थळ सुरु होते. मात्र, लागलीच ते बंद होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे उत्पन्नाचे दाखले, अधिवास आणि रहिवास दाखले मिळत नसून त्या अभावी महाविद्यालय प्रवेश रखडत आहे. अकरावी प्रवेशासाठीच्या पहिल्या यादीनुसार प्रवेश घेण्याची मुदत सोमवारी संपली आहे. मात्र,दाखल्यांअभावी अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश घेताच आला नसल्याचे दिसून आले आहे, असे परांजपे यांनी सांगितले.

एकीकडे गतीमान सरकार असल्याचा दावा करणाऱ्या या शिंदे-फडणवीस सरकारला शासकीय संकेतस्थळ गतीमान करता येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नेहमी आपल्या भाषणामध्ये हे सरकार सर्वसामान्यांचे आहे; हे सरकार गतीमान आहे, असे सांगत असतात. परंतु, या तथाकथीत गतीमान सरकारने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा खेळखंडोबा चालविला आहे, असा आरोप आनंद परांजपे यांनी केला.

दरम्यान, शाळा तसेच महाविद्यालयीन प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांकडून विविध दाखल्यांची मागणी केली जात आहे. यामुळे विद्यार्थी तसेच पालकांना तहसिलदार कार्यालयामध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत.

विहीत मुदतीत दाखले न मिळाल्याने विद्यार्थ्यांना शाळा तसेच महाविद्यालयीन प्रवेशासाठी अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे शासनाकडून विद्यार्थ्यांसाठी तसेच शैक्षणिक व इतर ज्या परीक्षा असतील त्यांच्यासाठी दाखले सादर करण्यासाठी ३ महिन्यांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणीही आनंद परांजपे यांनी केली आहे.

# वन विभागाच्या पदभरती प्रक्रियेत गैरप्रकार आढळल्यास उमेदवारांनी तक्रार नोंदवावी

**मुंबई :** वन विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट- ब (अराजपत्रित), गट- क व गट- ड संवर्गातील पदभरती प्रक्रियेदरम्यान काही बाह्य हस्तक्षेप, उमेदवारांना नोकरी देण्याची आमिषे देणे, अफवा पसरविणे, अपप्रचार करणे अशाप्रकारच्या घटना निदर्शनास आल्यास त्याविरुद्ध तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या टोल फ्री क्रमांक १०६४ किंवा पोलिसांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन महसूल व वन विभागाने केले आहे.

वनविभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील पदे भरण्यासाठी जाहीरात देवून निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. उमेदवारांनी कोणत्याही अफवा, अपप्रचारावर विश्वास ठेवू नये. तसेच कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. अशाप्रकारच्या अपप्रवृत्ती, अपप्रचार निदर्शनास आल्यास त्याविरुद्ध तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) टोल फ्री क्रमांक १०६४ किंवा पोलिस यंत्रणेकडे तक्रार नोंदवावी. तसेच जे उमेदवार भरती प्रक्रियेवर अनैतिक मार्गाने प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, असेही महसूल व वन विभागाने म्हटले आहे.

# बीएसयूपी घोटाळ्यातील ठामपा अधिकाऱ्यांवर एसीबी कारवाईची टांगती तलवार

## ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतली मनसेच्या संदीप पाचंगे यांच्या तक्रारीची दखल

### 'भाडेखाऊ'' गजाआड कधी होणार?

**२०१३ पासून या योजनेतील उरलेल्या घरांमध्ये अनधिकृत रित्या लोक राहत आहेत. या लोकांकडून स्थानिक गुंड महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या साथीने भाडे उकळत होते. बऱ्याच ठाणेकरांना घरे मिळवून देतो म्हणून फसविण्यात आले आहे. बीएसयुपी प्रकल्पाच्या घरे बांधणी पासून ते सदनिका वाटप या सर्वच बाबतीत भ्रष्टाचार झाला आहे.**

**ठाणे :** ठाणे महापालिकेचा बीएसयूपी प्रकल्प घोटाळा पुन्हा एकदा चर्चेला आला आहे. बीएसयूपीमध्ये लागलेली भ्रष्टाचाराची कीड रोखण्यासाठी दीड वर्षांपूर्वी मनविसेने गोरगरिबांच्या घरांमध्ये अनधिकृतरित्या बिर्हाड थाटणार्या बोगस सदनिकाधारकांचा पर्दाफाश केला होता. याची दखल आता ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतली असून या तक्रारीबाबत मनविसेचे राज्य सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी यांचा जबाबही नोंदवून घेण्यात आला आहे. त्यामुळे आता पालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना लवकरच कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

शहरे झोपडपट्टीमुक्त व्हावे तसेच गरिबांना घरकुले मिळावी, या उद्देशाने केंद्र सरकारने बेसिक सर्व्हिसेस फॉर अर्बन पुअर अर्थात बीएसयूपी योजना राबविली. मात्र या योजनेतही पालिकेची भ्रष्टाचाराची गटारगंगा वाहू लागली. ठाण्यातील धर्मवीर नगर येथे २०१३ मध्ये बीएसयुपी योजनेंतर्गत उभारलेल्या आनंदकृपा सोसायटी इमारत क्रमांक २३ मध्ये रहिवाशांना सदनिका दिल्या होत्या. या इमारतींमधील ६०३, ८०२,८०४, ८०५ व ८०७ यासदनिकांचा अनधिकृतरित्या ताबा घेतला होता. ही तक्रार मनसेचे संदीप पाचंगे यांच्याकडे आली होती. सोसायटीच्या रहिवाशांनी याप्रकरणी पालिकेकडे तक्रार करूनही बोटचेपे धोरण स्वीकारल्याने अखेर पाचंगे यांनी कारवाईसाठी पाठपुरावा केला. शिवसेनेच्या शाखाप्रमुखा सह ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. बीएसयुपी इमारतीत नक्की राहते कोण याची पडताळणी करण्यात येणार होती मात्र दीड वर्षांपूर्वी केवळ कारवाईच्या नावाखाली चौकशी समिती नेमण्यात आली पण संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई झाली नव्हती. दरम्यान या प्रकरणाची ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणाची दखल घेतली असून बीएसयूपी प्रकल्प घोटाळ्याच्या तक्रारीवरून जबाब नोंदवून घेतला असून कागदपत्रेही सादर करण्यात आली आहेत. त्यामुळे लवकरच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता असल्याचे पाचंगे यांनी नमूद केले.

*सध्या राहणारे नागरिक देखील त्रस्त आहेत अद्याप सोसायटी हस्तांतरित झालेल्या नाहीत. चौकशी समिती अहवाल अद्याप बाहेर न आल्यामुळे काही अधिकारी भ्रष्टाचारात सामील असल्याचे सिद्ध होते आहे.*

*– संदीप पाचंगे. सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य.*
*महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना*

### चौकशी समिती नावापुरतीच

दीड वर्षांपूर्वी बीएसयूपीतील अनागोंदी कारभार समोर आल्यानंतर ठाणे महापालिकेने तत्कालीन आयुक्त विपीन शर्मा यांनी अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची चौकशी समिती नेमली होती मात्र चौकशी समिती नेमूनही गेल्या दीड वर्षात या घोटाळ्याप्रकरणी कोणावरही कारवाई झालीच नाही. त्यामुळे मनविसेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा सुरूच आहे. लाचलुचपत विभागाने दखल घेतल्यामुळे आता या प्रकरणात लवकरच संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# शहराचा विकास झपाट्याने होतोय - मुख्यमंत्री

**ठाणे :** केवळ टोलेजंग इमारतींमुळे शहराचा विकास होत नाही तर, शहरातील नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक बाबी, विरंगुळ्यासाठी उद्याने, खेळासाठी मैदाने या महत्त्वाच्या बाबींची गरज आहे. त्यातूनच ठाणे शहरातील चित्र बदलते आहे. रस्ते मोठे झाले, शहराचे सौंदर्यीकरण झाले, शहराचा विकास झपाट्याने होत असून येत्या काही दिवसात ठाणे ते बोरीवली हे अंतर अवघ्या दहा मिनिटांत पार करणे शक्य होणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी ठाण्यात केले.

वाहतूक कोंडीतून ठाणे शहराला मुक्त करण्यासाठी काम सुरू आहे. निरोगी शहर उभे करण्यात येत आहे. त्यादृष्टीने आजचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले जात आहे. आपल्या शहरांमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार झाले पाहिजेत. मुलांमध्ये कौशल्य आहे, त्यांच्यासाठी व्यासपीठ देण्याचे काम राज्य सरकार करीत आहे. विकासाची ही कामे जनतेच्या पैशातून होत आहेत. त्यामुळे त्यात गुणवत्तेत कोणतीही तडजोड होता कामा नये, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी या सोहळ्यात स्पष्ट केले.




ठाणे महापालिका क्षेत्रात राज्य सरकारच्या अनुदानातून हाती घेतलेल्या तसेच आमदार प्रताप सरनाईक यांच्या प्रयत्नातून होत असलेल्या विविध विकास प्रकल्पांचा लोकार्पण आणि भूमिपूजन सोहळा रविवारी काशिनाथ घाणेकर नाटयगृह येथे झाला. या कार्यक्रमात, राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, आदिवासी क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, मिनाक्षी शिंदे, अशोक वैती, माजी नगरसेवक देवराम भोईर, माजी स्थायी समिती सभापती राम रेपाळे आणि संजय भोईर, माजी नगरसेविका परिषा सरनाईक, माजी नगरसेवक पुर्वेश सरनाईक, ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी आदिवासी बांधवांसाठी विविध माध्यमातून विकासाची कामे मोठ्या प्रमाणात केली आहेत. त्यामुळे एक श्रद्धास्थान म्हणून आदिवासी बांधव शिंदे यांच्याकडे पाहतात, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले. तसेच, महानगरपालिकेला मिळालेल्या सुविधा भूखंडावर आदिवासी मुलींच्या वसतीगृहाचे काम आज सुरू होत आहे. ३२० मुलींची व्यवस्था तेथे केली जाणार आहे. आमदार प्रताप सरनाईक यांनी त्यासाठी विशेष प्रयत्न् केल्याचा उल्लेख गावित यांनी केला.

मुख्यमंत्र्यांचे ठाणे कसे असावे, याचे प्रात्यक्षिक आज आपण या कार्यक्रमात पाहतो आहोत. ठाणेकरांनी न मागता मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी भरभरून दिले आहे. त्यांना ठाणेकरांच्या मनात काय आहे ते लगेच कळते. त्यामुळे सूर्या धरणातून ठाण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्नही करत आहात. सूर्यामधून भविष्यात मिळणारे २५० एमएलडी पाणी मिळाले तर या भागाचा पाण्याचा प्रश्न निकाली निघेल, असे आमदार प्रताप सरनाईक या समारंभात म्हणाले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ३ जुलै २०२३




# ठामपाच्या काही अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे समतानगरमधील नागरिकांच्या जीवास धोका

## आमदार सरनाईक यांचा आरोप

**ठाणे :** समता नगर, राजीव गांधी कंपाउंड येथील पंचरत्न चाळीतील सहा घरांचा सज्जा पडून एक जखमी झाला. या दुर्घटनेनंतर बुधवारी आमदार प्रताप सरनाईक यांनी त्या वसाहतीस भेट दिली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी यांच्याकडून एमएमआरडीएच्या मालकीच्या असलेल्या वर्तकनगर येथील आकृती हब टाऊन या इमारतीमधील घरे तात्पुरत्या स्वरूपात या ४२ रहिवाश्यांसाठी घेतल्यामुळे सध्या तरी या रहिवाश्यांना तात्पुरत्या स्वरूपात निवारा मिळालेला आहे. परंतू, या सर्व रहिवाश्यांना कायमस्वरूपी घरे मिळण्यासाठी महानगरपालिकेने लवकरात लवकर हा प्रश्न निकाली काढावा व रहिवाश्यांना न्याय द्यावा. तसेच या प्रकल्पाच्या कामामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार त्यांनी केली.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात १९९७ साली

रस्त्याचे रूंदीकरण करीत असताना तात्कालीन आयुक्त टी चंद्रशेखर यांनी समतानगर व लोकमान्यनगर पाडा नं. १ येथील काही भुखंडावर विस्थापितांचे पुर्न:वसन केले होते. तात्कालिन शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रयत्नाने सर्व विस्थापितांना ही जागा मिळाली होती. त्यावर सर्व रहिवाश्यांनी आपल्या आर्थिक कुवतीनुसार तळ अधिक एक मजल्याचे बांधकाम केले होते. तर समतानगर येथील राजीव गांधी नगर येथे काही विस्थापितांनी २ अथवा ३ मजल्याच्या इमारती बांधल्या होत्या. या बांधकामाला २४ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला असल्याकारणाने ही सर्व घरे व इमारती धोकादायक झालेल्या आहेत.

काही वर्षांपूर्वी समतानगर येथील आनंदराम मधील विस्थापितांच्या वसाहतीमधील काही घरे पडली असता तात्कालिन आयुक्त संजीव जयस्वाल यांनी घटनास्थळी भेट देऊन या सर्व विस्थापितांना मालकी तत्वावर घरे मिळावीत या उद्देशाने वर्तकनगर येथील इमारत क्रं. ५४,५५,५६ या इमारतींची



ज्या पध्दतीने पीपीपी तत्वावर बांधणी झाली त्याच पध्दतीने या वसाहतींचे पुर्नवसन करण्यासंदर्भात महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता मोहन कलाल यांना जबाबदारी दिलेली होती. परंतू,आमदार सरनाईक यांनी सर्व रहिवाश्यांसह मोहन कलाल यांच्याकडे पाठपुरावा करून सुध्दा अद्यापपर्यंत या प्रकल्पाला कुठलीही गती प्राप्त झालेली नाही.

चार महिन्यांपूर्वी विद्यमान आयुक्त अभिजित बांगर यांच्याबरोबर आमदार प्रताप सरनाईक यांनी भेट घेतली असता, आयुक्तांनी या संदर्भातील कार्यवाही करण्याचे आदेश मोहन कलाल यांना दिले होते. या घटनेला देखील चार महिने उलटूनही प्रकल्पाला गती प्राप्त झालेली नाही.

याउलट मंगळवारी २७ जून, २०२३ रोजी दुपारच्या वेळेस या परिसरातील दोन चाळींचे सज्जे कोसळल्याची दुर्घटना घडली. सज्जे कोसळण्याची घटना जर सकाळच्या वेळेस घडली असती तर मोठी दुर्घटना होऊन जिवितहानी सुध्दा झाली असती, असे रहिवाश्यांचे म्हणणे आहे. असे सरनाईकांनी सांगितले.

समतानगर मधील राजीव गांधी नगर येथे भेट देताना अतिरिक्त आयुक्त संजय हिरवाडे, उपायुक्त मनोज जोशी, सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, विभागप्रमुख भगवान देवकते उपस्थित होते.

# ठामपाच्या सेवाप्रवेश नियमावलीस राज्यशासनाची मान्यता

## महापालिकेच्या इतिहासात प्रथमच एकत्रित सेवाप्रवेश नियमावली मंजूर

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेची स्थापना १९८२ या वर्षी झाली. ठाणे हे शहर मुंबईलगत असल्याने ठाण्यात राहण्यासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर पसंती मिळत आहे. नव्याने विकसित झालेल्या घोडबंदर विभागामुळे नागरिकरणामध्ये झपाट्याने वाढ होत आहे, यानुसार नागरिकांना मुलभूत सेवासुविधांसह मानदंड ठरणारे प्रकल्प राबविणे, केंद्र व राज्यशासनाचे महत्वाचे उपक्रम, संस्था, प्रकल्प यामुळे पायाभूत सुविधा नियमित व गतीमान पध्दतीने उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी महापालिकेला प्रशासन म्हणून भूमिका पार पाडत असताना महापालिकेच्या आस्थापनेवरील पदे निर्माण करणे आवश्यक होते. तसा प्रस्ताव महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी राज्यशासनास सादर केला होता, त्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने २७ जून २०२३ रोजी मान्यता मिळाली असून आगामी काळात ठाणेकरांना अधिक गतिमानतेने सेवासुविधा उपलब्ध होणार असून महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरणाचा प्रस्ताव मंजूर झाला असल्याचेही आयुक्तांनी नमूद केले.

१९८२ मध्ये स्थापन झालेली ठाणे महानगरपालिका आज 'ब' वर्ग दर्जाची झाली आहे. सद्यस्थिती महापालिकेच्या नऊ प्रभाग समित्या असून एकूण क्षेत्रफळ १४७ चौ.कि.मी इतके आहे. २०२२ च्या जनगणनेनुसार ठाणे महानगरपालिकेची लोकसंख्या १८.४१ लाख असून आज रोजी अंदाजे २७ लाख इतकी आहे. या लोकसंख्येला सेवासुविधा पुरवित असताना निश्चितच महापालिकेच्या आस्थापनेवर अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक होण्याकरिता सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण अंतर्गत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदे ही महापालिकेच्या वेळोवळी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने निश्चित करण्यात येत होती व त्या - त्या पदांसाठी असलेल्या सेवाशर्ती व नियम हे महासभेच्या मान्यतेने करण्यात येत होते. अशा सेवा शर्थींना पदनिहाय त्या- त्या वेळी शासनाकडून मान्यता घेण्यात येवून अशी पदभरती पदोन्नती/ नामनिर्देशनाने करण्यात येत होती. विविध कालावधीत आवश्यकतेनुसार त्या त्या पदांचे सेवाप्रवेश, नियम निर्धारित झालेले असल्याने त्यामध्ये विविधता दिसून येत होती. यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या सर्व पदांकरिता एकात्मिक अशी सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण, नियम असणे आवश्यक होते, याबाबत मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांकरिता सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण, नियम तात्काळ निश्चित करणेबाबत निर्देश दिले होते.

या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेमार्फत महापालिकेच्या आस्थानेवरील विविध संवर्गाकरिता सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण तयार करुन मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने शासनास सादर करण्यात आले होते, यास शासनाने दिनांक २७ जून २०२३ रोजी मान्यता दिली आहे. त्यामुळे आता सर्व पदांकरिता मान्यता मिळाली असल्याने यामध्ये आगामी काळात एकसूत्रीपणा येणार असल्याचे आयुक्त बांगर यांनी नमूद केले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या सेवा नियम २०२३ शासनाने मंजूर केल्यामुळे महापालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदे भरण्याबरोबरच पदोन्नती व आश्वासित प्रगतीचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होणार असल्याने नागरिकांना महापालिकेमार्फत उत्तम दर्जाच्या सेवा कमी वेळेत सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होणार असल्याचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी कर्मचारी यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये देखील आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, ३ जुलै २०२३


# नौपाडा, कोपरी, लुईसवाडी भागात पाण्याला वास

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील नौपाडा, कोपरी, गांधीनगर, हाजुरी, लुईसवाडी या भागात पाण्याला काही ठिकाणी वास येत आहे. तसेच पाणी गढूळ येतअसल्याच्या तक्रारी आल्या आहेत. या भागाला मुंबई महापालिकेच्या जलवाहिनीतून पाणीपुरवठा केला जातो. याप्रकरामुळे ठाणेकर नागरिकांच्या आरोग्य धोक्यात आले असून साथीचे आजार पसरण्याची भीती आहे. त्यामुळे नागरिकांनी गाळून आणि उकळून पाणी प्यावे असे आवाहन ठामपाने केले आहे. मुंबई महापालिकेच्या जल विभागाने दिलेल्या सूचनेनुसार, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यामुळे धरणातून जलवाहिनीत गढूळ पाणी येत आहे. तसेच, पाण्याला वासही येतो आहे. हे पाणी पिसे-पांजरापोळ जलशुद्धीकरण केंद्रातून शुद्ध करण्यात येते. तरीही नागरिकांनी पाणी गाळून आणि उकळून प्यावे, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे.

## पाणी गाळून आणि उकळून प्यावे

### महापालिकेचे आवाहन

**ठाणे :** पावसाळ्याचे दिवस असल्याने पिण्याच्या पाण्यातून जलजन्य रोगांचा प्रसार होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने दक्षतेचा उपाय म्हणून पिण्याचे पाणी गाळून आणि उकळून प्यावे, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे.नागरिकांनी आपल्या इमारतीमध्ये असलेल्या जमिनीखालील व इमारतीवरील पाण्याच्या टाक्या आतून स्वच्छ करून घ्याव्यात. पाण्याच्या टाकी सभोवतालची जागा स्वच्छ ठेवावी. या उपायांमुळे जलजन्य रोगांचा प्रसार टाळता येईल. त्यामुळे नागरिकांनी ही दक्षता घ्यावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे जलजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पाणी नमुन्यांच्या तपासणीचे प्रमाण या काळात वाढविण्यात येते. शहरात वेगवेगळ्या भागात आवश्यकतेनुसार नागरिकांना क्लोरिन गोळ्यांचे वाटप करण्यात येते. त्याचबरोबर, ओआरएस पाकिटे दिली जातात. तसेच, महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रात योग्य त्या औषधांचा साठाही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# 'प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी जाणले होते'

## संशोधक प्रा.डॉ. रमेश जाधव




**ठाणे :** व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये प्राथमिक शिक्षणाचे स्थान मोलाचे असते. हा विचार राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या कार्यातून पुढे नेला. सामाजिक सुधारणा, उद्योग आदींबाबत निर्णय घेतानाही त्याचा पाया प्राथमिक शिक्षणाच्या सबलीकरणात शोधण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या शैक्षणिक कार्यात केला, असे प्रतिपादन संशोधक प्रा. डॉ. रमेश जाधव यांनी 'विचारमंथन व्याख्यानमाले'चे चौथे पुष्प गुंफताना केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १४९व्या जयंती दिनाच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेतर्फे सोमवार, २६ जून रोजी काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे प्रा. डॉ. रमेश जाधव यांचे, 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य आणि विचार' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भाषणापूर्वी, ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी प्रा. डॉ. रमेश जाधव यांचे पुस्तके, शाल आणि चित्रप्रतिमा देऊन स्वागत केले.

शाहू महाराजांनी गादीवर येण्यापूर्वी संपूर्ण संस्थानाचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांना गावांमध्ये प्राथमिक शाळांचा अभाव जाणवला. कुठे शाळा होती तिथे शाळेच्या वास्तूची पडझड झालेली आढळली. काही ठिकाणी शाळेत शिक्षक नव्हते. ही सर्व परिस्थिती पाहिल्यावर शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारा आदेश काढला. तसेच, त्यादृष्टीने आर्थिक तजवीज सुरू केली, असे डॉ. रमेश जाधव यांनी सांगितले.

महाराजांनी कारभार हाती घेतला तेव्हा संस्थानात २२४ शाळा होत्या आणि १५ हजार विद्यार्थी होते. त्यांच्यावर संस्थानाच्या एकूण उत्पन्नापैकी ३.५ टक्के खर्च होत होता. तो शाहू महाराजांनी वाढवला. खर्चासाठी शाळांना धार्मिक संस्थांच्या उत्पन्नाशी जोडून दिले. १९२२मध्ये शाळांची संख्या ४००च्या पुढे गेली. २२ हजार विद्यार्थी झाले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केल्यावर कोल्हापूर संस्थानात शिक्षणाचा प्रसार वेगाने झाला, असे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले.

महात्मा जोतीराव फुले यांचा शिक्षणाचा विचार, सत्यशोधक चळवळ शाहू महाराजांनी पुढे नेली. प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची मोहिम शाहू महाराजांनी हाती घेतली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यात आले. मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शिष्यवृत्ती देण्यास सुरूवात केली. अस्पृश्यता निवारणासाठी घेतलेल्या निर्णयानुसार, शाळेबाहेर बसणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्र बसण्याची व्यवस्था शाहू महाराजांनी केली. पालकांनी विद्यार्थ्यांना शाळेत पाठवावे, त्यात अडसर आणू नये, यासाठी विद्यार्थी गैरहजर राहिला तर त्यांच्या पालकांना दंड करण्यास सुरूवात केली, अशी माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

# रत्नागिरीत सागरी विद्यापीठासाठी जागा निश्चित करावी

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील

**मुंबई : रत्नागिरी जिल्ह्यात सागरी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी जागा निश्चित करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.**

सिंहगड या शासकीय निवासस्थानी मंत्री श्री.पाटील यांनी रत्नागिरीतील उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित कामांविषयी आज आढावा घेतला. या बैठकीला रत्नागिरीचे पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंग, तंत्रशिक्षण संचालक डॉ विनोद मोहितकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



कोकणाला मोठी सागरी किनारपट्टी लाभलेली आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात सागरी विद्यापीठ व्हावे अशी मागणी पालकमंत्री उदय सामंत यांनी केली होती. त्याअनुषंगाने आज मंत्री श्री. पाटील यांनी आढावा घेत रत्नागिरीत सागरी विद्यापीठासाठी जिल्हाधिकारी यांनी जागा निश्चित करून शासनाला प्रस्ताव सादर करावा. यासंदर्भात येत्या हिवाळी अधिवेशनात सागरी विद्यापीठ कायदा विधिमंडळात आणला जाईल, असे मंत्री श्री. पाटील यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील इतर विषयांबाबत आढावा घेताना मंत्री पाटील म्हणाले, रत्नागिरी जिल्ह्यात शासकीय विधी महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव पुन्हा विधी व न्याय विभागाला सादर करण्यात येईल. यासंदर्भात विधी व न्याय मंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून विधी महाविद्यालयाचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाची मुख्य इमारत व हायड्रोलिक वर्कशॉप इमारतीचे बळकटीकरण, मुला-मुलींच्या वसतिगृहाचे बळकटीकरण आणि शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या विस्तारित इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या तसेच रत्नागिरी येथे स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्किटेक्चर स्थापन करण्याबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना देखील मंत्री श्री. पाटील यांनी प्रशासनाला दिल्या.

# शाश्वत विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी नवीन शैक्षणिक धोरण अत्यंत महत्त्वाचे -उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे



**ठाणे: संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास आराखड्यामधील सार्वजनिक शिक्षण विषयावर आधारित नवीन शैक्षणिक धोरण आहे. हे अत्यंत महत्त्वाचे धोरण असून यामुळे समाजातील मूल्य अधिक दृढ होण्यासाठी मदत होणार आहे आणि विकासाची गती आणखीन जलद होणार आहे. त्यामुळे या धोरणाची माहिती लोकप्रतिनिधींना व्हावी व त्यावर साधकबाधक चर्चा व्हावी, यासाठी विधीमंडळाच्या येत्या अधिवेशनात विधानपरिषदेत त्यावर विशेष चर्चा करण्यात येणार असल्याचे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी सांगितले.**

ज्ञानसाधना ठाणे संस्थेच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, राष्ट्रीय मूल्यांकन परिषद, सामाजिक शास्त्र संशोधन संस्था व मुंबई विद्यापीठाच्या वतीने डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात आयोजित 'चांगल्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्थांमधील सकारात्मक बदल – नवीन राष्ट्रीय धोरण २०२०' विषयावरील परिषदेच्या उद्घाटन समारंभात डॉ. गोऱ्हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या. यावेळी आमदार निरंजन डावखरे, राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी, स्व. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु संजीव सोनवणे, नॅकचे सल्लागार देवेंद्र कवडे, शामसुंदर पाटील, संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, मानसी प्रधान, प्रसाद प्रधान, राजीव प्रधान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, सतीश शेठ, अश्विनी कोतवाल, स्वाती साठे आदी यावेळी उपस्थित होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, नवीन शैक्षणिक धोरण हे शाश्वत विकास आराखडा मधील मुद्दा क्र. ७ सार्वजनिक शिक्षण विषयावर आहे. विकासाच्या प्रक्रियेत सर्वांचा सहभाग हे युनोचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी हे नवीन धोरण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे देशाच्या विकासात नवीन शैक्षणिक धोरणाची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. शैक्षणिक संस्थांमधील प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचनेचाही समावेश या धोरणात आहे.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, गेल्या वीस ते तीस वर्षांत देशाच्या शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. तंत्रज्ञानाचा वाढता वापर, विद्यार्थ्यांचा सहभाग, बहुशाखीय शिक्षण असे झालेले बदल लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणावर चर्चा व्हायला हवी. देशात अनेक शाळा कॉलेजेस हे खूप जुनी आहेत. त्यामध्ये एक साचेबंद शिक्षण दिले जाते. या कॉलेज व शाळांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण राबविताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. तथापि हे धोरण देशाला व समाजाला पुढे घेवून जाईल. त्यामुळे या धोरणाची महाराष्ट्रात अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. हे अत्यंत महत्त्वाचे धोरण असल्यामुळे चांगल्या शिक्षण व्यवस्थेसाठी या धोरणाच्या अंमलबजावणीत शिक्षण संस्था तसेच नागरिकांचाही सहभाग आवश्यक आहे.

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात पदवीधर व शिक्षक मतदारसंघामधून निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत. ते शिक्षण, शाळा व्यवस्थापन याविषयांवर सतत प्रश्न मांडत असतात. यातून शिक्षकांचे व पदवीधर यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले जातात. येत्या अधिवेशनात नवीन शिक्षण धोरणावर विधान परिषदेमध्ये सविस्तर चर्चा घडवून आणण्यात येईल. यामुळे विशेषत: नवीन शैक्षणिक धोरणाबद्दलचे अनेक गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. आजच्या चर्चासत्रातून निघणारे निष्कर्ष हे आमच्याकडे पाठविल्यास राज्यात या धोरणाची अंमलबजावणी करताना त्याचा उपयोग होईल. धोरण अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची असल्याने याबाबत शासन करत असलेल्या प्रयत्नांचाही आढावा घेण्यात येईल, असेही डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

आमदार डावखरे म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाने गेल्या काही काळापासून विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून काम सुरू केले आहे. त्यातून शिक्षण हक्क कायदा आणला. मात्र, त्यात काही त्रुटी असून त्या दूर करण्यासाठी शिक्षण संस्थांबरोबर चर्चा करायला हवी.

प्रधान सचिव रस्तोगी म्हणाले की, राज्य शासनाने शिक्षणाच्या दर्जावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे नॅक मानांकनात प्रथम क्रमांकात राज्य ठरले आहे. स्वायत्त शिक्षण संस्था तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या उच्च शिक्षणामध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली असून पुढील वर्षी सर्वच महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण लागू होणार आहे. हे धोरण राज्यात सुलभरित्या राबविण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सुकाणू समिती स्थापन केली आहे.

---

# अमृत योजनेंतर्गत घोडबंदरवरील भुयारी गटार योजनेत ५० कोटींचा घोटाळा

## १७९ कोटींचा प्रकल्प नेला २२० कोटींवर

## मनसेचा आरोप

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या स्मार्ट सीटीतील घोटाळा उघडकीस आल्यानंतर आता अमृत योजनेतील घोटाळा उघडकीस आला आहे. केंद्र सरकारच्या अमृत योजने अंतर्गत ठाणे शहरातील घोडबंदर रोड व परिसर येथे राबवलेल्या भुयारी गटार योजनेत तब्बल ५० कोटींचा घोटाळा झाल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभागाचे शहर अध्यक्ष स्वप्निल महिंद्रकर यांनी उघडकीस आणली आहे. अडीच वर्षात हां प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मुदत असताना ५ वर्ष उलटले तरी अद्यापही हां प्रकल्प अपूर्णच असल्याने ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नगरविकास विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच केंद्र सरकारच्या नियमांना तिलांजलीच वाहली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात केंद्र सरकारच्या अमृत योजनेअंतर्गत विविध प्रकल्प राबविण्यात आले होते. त्यातील घोडबंदर परिसरात भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक चार हा महत्त्वपूर्ण प्रकल्प जानेवारी २०१८ साली हाती घेण्यात आला होता. या प्रकल्पाच्या अंतर्गत एसटीपी बांधणे, मलवाहिने टाकणे, मलउच्छादन केंद्र बांधणे तसेच हाऊस कनेक्शनचे काम करणे अपेक्षित होते. पण महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने या प्रकल्पातील बहुतेक कामांना कात्री लावून जवळपास ५० कोटीचा घोटाळा केल्याचे उघड होत आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत करण्यात येणारी कामे बहुतेक प्रमाणात वगळण्यात आली असून त्या कामाची होणारी बचत न दाखवता पालिकेच्या संबंधित अधिकारी यांनी स्थायी समिती तसेच महासभा ठरावात जवळपास ४१ कोटींची वाढीव कामे दाखवून रक्कम वाढविण्यात आली आहे. म्हणजेच मूळ हा प्रकल्प १७९ कोटींचा असून तो आता २२० कोटींवर नेण्यात आला आहे.भुयारी गटार योजना तसेच हाऊस कनेक्शनच्या कामात जवळपास ४० टक्क्यांचे काम वगळण्यात आले आहे. मात्र या वगळण्यात आलेल्या कामांमुळे झालेल्या बचतीचा उल्लेख पालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला नसल्याचे कागदपत्रावरून समोर आले आहे. या घोटळ्यात महानगरपालिकेचे माजीवाडा मानपाडा मलनि:सारण विभागाचे कार्यकारी अभियंता मुख्यसूत्रधार असून त्यांना महानगर पालिकेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांचे पाटबळ असल्याचा आरोप महिंद्रकर यांनी केला आहे. या घोटाळ्या संदर्भात राज्य शासनाच्या नगर विकास विभाग तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांना पत्रव्यवहार केला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचे सदस्य सचिव यांनी आयुक्तांना पत्र लिहून संबंधित घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

### मलनि:सारण केंद्र बंद

या प्रकल्पामध्ये हिरानंदानी पाटलीपाडा येथे मलनि:सारण केंद्र उभारण्यात आले असून या केंद्राला जाण्यासाठी योग्य रस्ता देखील नसून सध्या मलनि:सारण केंद्र बंद स्थितीत आहे.

***या प्रकल्पात झालेला घोटाळा खूपच धक्कादायक असून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केंद्र शासन तसेच राज्यशासन यांची दिशाभूल केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई होणे अपेक्षित असून त्यांच्या मालमत्तेची आयकर विभागाच्या माध्यमातून तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या माध्यमातून चौकशी व्हावी.***

***–स्वप्नील महिंद्रकर, ठाणे शहराध्यक्ष, जनहित व विधी विभाग मनसे***

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, ३ जुलै २०२३



# साबे गावातील अर्धवट स्थितीतील इमारत पालिकेकडून मे महिन्यातच धोकादायक घोषित

## मात्र पुनर्वसना अभावी १५ कुटुंबाचा जीव धोक्यात

**दिवा:- साबे गावातील सदुरू कृपा इमारत ही मे महिन्यात ठाणे महानगरपालिकेकडून धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली. मात्र येथील नागरिकांचे पुनर्वसन न झाल्याने पावसाळ्यात धोकादायक इमारतीत वास्तव्यास असणाऱ्या येथील रहिवाशांना जीव मुठीत राहून राहावे लागत आहे.**





दिव्यातील साबे गावात दहा वर्षांपूर्वी सद्गुरु कृपा इमारत बांधण्यात आली.या इमारतीचे काम अपूर्ण असल्याने मागील काही वर्षात ही इमारत कमजोर झाली आहे.या इमारतीत राहणारे नागरिक जीव मुठीत घेऊन रहात आहेत. तसेच आम्ही मृत्यूच्या छायेत जगत आहोत असा टाहो तेथील राहणारे नागरिक फोडत आहेत.ही इमारत तीन मजल्याची असून यात तीस खोल्या आहेत.त्यातील फक्त पंधराच खोल्यांमध्ये कुटुंबे वास्तव्यास आहेत. उर्वरीत कुटुंबेही जीव मुठीत घेऊन रोजचा दिवस ढकलत आहेत. यातील तळमजल्यावरील दोन खोल्या मधील इमारतीचे खांबांचे आणि छताचे सिमेंट निघून लोखंडी सळ्या दिसायला लागल्यामुळे तेथे राहणाऱ्या नागरिकांनी तातडीने खोल्या केल्या. या इमारतीस छत नसल्यामुळे पावसाचे पाणी चारही बाजूने गळत असल्याने इमारत मोडकळीस आलेली आहे, अशी माहिती नागरिकांनी दिली. तसेच या इमारतीस मे महिन्यात ठाणे महापालिकेची धोकादायक इमारत खाली करण्याची नोटीस आलेली आहे.महापालिका प्रशासनाने नोटीस बजावली मात्र या इमारती मधील नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणतेच धोरण नसल्याने येथील नागरिकांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत आहे.

या धोकादायक इमारती मधील रहिवाशांना न्याय मिळुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिवसेना साबे विभाग प्रमुख निलेश पाटील या विषयावर बोलताना सांगितले.

# ठाणे रेल्वे स्थानकातून धर्मवीर आनंद दिघे एक्सप्रेस सुरु करा

**ठाणे:** दरवर्षी गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या कोकणवासीयांना गर्दीचा सामना करावा लागतो त्यामुळे प्रवाशांचे खूप हाल होत असतात ते कमी करण्यासाठी कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने केलेल्या मागणीनुसार खासदार राजन विचारे यांनी आज केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसेच केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना पत्राद्वारे ठाणे वासियांचे गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे हे श्रद्धास्थान असल्याने गणेशोत्सवासाठी (अनारक्षित) धर्मवीर आनंद दिघे एक्सप्रेस ठाण्यातून सुरू करावी अशी मागणी केली आहे.

या पत्रात त्यांनी असेही म्हटले आहे कि, सन २६ जानेवारी १९९८ रोजी प्राध्यापक मधु दंडवते यांच्या प्रयत्नाने भारतीय रेल्वेतील कोकण रेल्वे प्रकल्पातील रेल्वे मार्गावर मुंबई ते बेंगलोर अशी रेल्वे सेवा सुरू करण्यात आली होती. प्रवाशांचा प्रतिसाद लक्षात घेता मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, दिवा व पनवेल या स्थानकातून दैनंदिन कोकण रेल्वे सेवा अधिक सुरु करण्यात आल्या. कोकण वासियांसाठी यापूर्वी होणारा एसटीचा प्रवास कमी होऊन कालांतराने रेल्वेने प्रवास अधिक वाढू लागला. तसेच पर्यटकांची गर्दी कोकणात अधिक वाढू लागल्याने कोकणवासीयांना जागा आरक्षित मिळत नाही याचा विचार करून खासदार राजन विचारे यांनी आपल्या लोकसभा मतदारसंघातील ठाणे, नवी मुंबई व मीरा-भाईंदर या शहरात कोकण वासियांची संख्या अधिक असल्याने ठाणे हे केंद्रबिंदू असल्याने ठाणे रेल्वे स्थानकातून ही रेल्वे सेवा गणेश उत्सवाच्या तीन दिवस आधी म्हणजे १६ सप्टेंबर २०२३ पासून व विसर्जनाच्या तीन दिवस नंतर म्हणजे १ ऑक्टोबर २०२३ रोजी ठाणे ते थिविम व थिविम ते ठाणे अशी अनारक्षित धर्मवीर आनंद दिघे एक्सप्रेस ठाणे रेल्वे स्थानकातून सुरू करावी अशी मागणी करण्यात आलेली आहे.

# जिद्द शाळेच्या विद्यार्थ्यांनी साजरी केली आषाढी एकादशी

**ठाणे** : पारंपारिक वेशभूषेत टाळ, मृदुंगाचा गजर करीत पालखी खांद्यावर घेवून जिद्द शाळेच्या मुलांनी आषाढीचे एकादशीनिमित्त शाळेत दिंडी काढली. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी बुधवारी जिद्द शाळेत उत्साहात आषाढी एकादशी साजरी केली.



हरिनामाचा गजर करीत शालेय विद्यार्थी दिंडीत उत्साहात सहभागी झाले होते. विठ्ठल रुक्मणिीची वेशभूषा करुन आलेल्या विद्यार्थ्यांनी शाळेतील शिक्षकांना साक्षात पंढरपूरचे दर्शन दिले. शाळा सुरू झाल्यानंतरचा आषाढी एकादशी हा पहिलाच उत्सव.. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण पसरले होते. टाळ, मृदुंगाचा गजर, हातात झेंडा व खांद्यावर विठ्ठलाची पालखी घेवून विद्यार्थ्यांनी दिंडीचा आनंद लुटला असल्याचे जिद्द शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना शेट्ये यांनी सांगितले.